## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र. १९१२/२०२१/नंदुरबार**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. शैलेंद्र सुभाष ईशी,<br>रा. साक्री नाका, नंदुरबार,<br>ता. जि. नंदुरबार. | शाखा अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. २, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार. | उप अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. २, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार. |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक - २४/०५/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १७/०२/२०२१ | १७/०२/२०२१ | २५/०२/२०२१ | १८/०३/२०२१ | १८/०३/२०२१ | २६/०४/२०२१ |

अपिलार्थी यांनी दि. १९/०७/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी विहित मुदतीत घेतली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये त्यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करण्याची तसेच रु. ५०,०००/- नुकसान भरपाई देण्याची विनंती केलेली आहे.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असुन इतर पक्षकार अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"सन २०२० ते दिनांक १२/०१/२०२१ या कालावधीतील सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र. १ मधील सर्व शाखा अभियंता यांनी केलेल्या कामाची माहिती, पुर्ण-अपुर्ण कामाची माहिती, मंजूर निधी, खर्च निधी, विकास आराखडा प्रमाणे माहिती, प्रस्तुत कामे अन्य कोणत्याही प्रस्तावित किंवा हाती घेण्यात आले नाहीत त्याबाबत प्रमाणपत्र याबाबतची माहिती छायांकित प्रतींसह मागितली होती. "

४. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दिनांक ०५/०५/२०२१ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. सदर निवेदनात अपिलार्थीने नमूद केले आहे की, माझ्या दिनांक ०८/०२/२०२१ रोजीचा १ अर्ज व

दिनांक १७/०२/२०२१ रोजीचे ४ माहिती अधिकाराच्या अर्जात मागणी केलेली संपुर्ण माहिती मला मिळाली असुन त्याबाबत माझे समाधान झाले आहे. माझी काहिहि हरकत वा तक्रार नाही, तरी माझे ५ ही अर्ज निकाली काढण्यात यावे, अशी विनंती.

सबब, अपिलार्थी यांच्या उपरोक्त नमूद लेखी निवेदनाच्या अनुषंगाने आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** ओ.११४२ दि. १०/०८/2023